दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दिल्लीकरांना 'ग्रीन फटाके' फोडण्यास परवानगी

नवी दिल्ली : दिवाळीच्या तोंडावर दिल्ली आणि संपूर्ण राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात (Delhi-NCR) वाढणारे हवेचे प्रदूषण लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (२ नोव्हेंबर) एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने दिवाळीच्या सणात 'ग्रीन फटाके' (Green Crackers) फोडण्यास मंजुरी दिली असली, तरी त्यासाठी विशिष्ट वेळ आणि कडक नियमावली लागू केली आहे. या नियमांचे तंतोतंत पालन करणे प्रशासन आणि नागरिक दोघांसाठीही अनिवार्य असणार आहे.

सिल्लोडमध्ये अल्पवयीन मुलीचे अपहरण

सिल्लोड : शहरातील महाराणा प्रताप चौक परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. नातेवाइकांनी तसेच शाळा परिसरात शोध घेऊनही मुलगी मिळून न आल्याने तिच्या वडिलांनी १ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजता सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी नातेवाइकांकडे आणि शाळा परिसरात तिचा शोध घेतला. मात्र, ती कुठेही आढळून आली नाही.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १९१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आदित्य ठाकरे यांचा दोन दिवसीय दौरा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शिवसेना नेते तथा आमदार आदित्य ठाकरे हे ३ व ४ नोव्हेंबर रोजी नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते शेतकऱ्यांशी संवाद साधून दुष्काळ अनुदानाचे जाहीर केलेले पाच हजार रुपये मिळाले का, पीक नुकसानीची भरपाई मिळाली का, तसेच शेतकऱ्यांच्या विविध अडचणी जाणून घेणार आहेत. यासोबतच शेतकरी मदत केंद्रांनाही भेट देणार आहेत.

३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.४५ वाजता मनेगाव (ता. सिन्नर), दुपारी २.३० वाजता गारज (ता. वैजापूर), दुपारी ४ वाजता खामगाव (ता. कन्नड) आणि सायंकाळी ५.३० वाजता भांगशीमाता गड येथे ते भेट देणार आहेत.

४ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता नेवासा फाटा, ११ वाजता कुकाणा, ११.४५ वाजता शनि शिंगणापूर आणि दुपारी २ वाजता पारनेर येथे त्यांचा दौरा असणार आहे. या दौऱ्यात शिवसैनिक, शिवसेना पदाधिकारी, सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, शेतकरी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कराची ते ढाका... जनता त्रस्त; दोन देशांत आंदोलनांचा भडका

मुंबई : भारताचे शेजारी देश पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये सोमवारी सामान्य नागरिकांचा संताप रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळाले. पाकिस्तानमधील कराची येथे वीजकपात आणि गॅस टंचाईविरोधात नागरिकांनी आंदोलन केले. तर बांगलादेशमध्ये कापड उद्योगातील हजारो कामगारांनी किमान मासिक वेतन 30 हजार टका करण्याच्या मागणीसाठी महामार्ग रोखले. आंदोलकांना हटवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या आणि पाण्याच्या फवाऱ्यांचा वापर केला. वाढती महागाई आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे दोन्ही देशांमध्ये असंतोष वाढताना दिसत आहे.

पाकिस्तानमधील कराची येथे पाकिस्तान पीपल्स पार्टीच्या नेतृत्वाखाली वीज आणि गॅस टंचाईविरोधात आंदोलन करण्यात आले. 'डॉन'च्या वृत्तानुसार, ल्यारी गेट येथून सुरू झालेल्या मोर्चाची सांगता कराची प्रेस क्लबबाहेर झाली. या आंदोलनात पक्षाचे नेते, कार्यकर्ते, महिला आणि स्थानिक नागरिक सहभागी झाले होते. आंदोलकांनी के-इलेक्ट्रिक आणि सुई सदर्न गॅस कंपनी विरोधात घोषणाबाजी करत वीज आणि गॅसचा पुरवठा नियमित करण्याची मागणी केली. मोर्चाचे नेतृत्व पीपीपीचे दक्षिण जिल्हाध्यक्ष जावेद नागोरी यांनी केले. खासदार सरदार नबील गाबोल यांनीही आंदोलनात सहभाग घेतला. नबील गाबोल यांनी के-इलेक्ट्रिकच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले. ल्यारीमधील काही भागांत दररोज तब्बल 16 तास वीजकपात होत असल्याचा आरोप जावेद नागोरी यांनी केला.

बांगलादेशमध्ये 30 हजार टका वेतनाची मागणी : बांगलादेशची राजधानी ढाका आणि आसपासच्या औद्योगिक भागांत कापड कामगारांचे आंदोलन तीव्र झाले. कामगार सध्या मिळणाऱ्या किमान वेतनात वाढ करून ते 30 हजार टका करण्याची मागणी करत आहेत. सध्याचे किमान वेतन 12,500 टका असल्याचे वृत्त आहे. महागाईमुळे अन्न, घरभाडे, वाहतूक आणि आरोग्यावरील खर्च वाढल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. सोमवारी गाझीपूरमधील कामगारांनी ढाका-टांगाइल महामार्ग रोखला. आशुलिया परिसरातही कामगारांनी नबीनगर-चंद्रा महामार्गावर आंदोलन केले. पोलिसांनी आंदोलकांना हटवण्यासाठी अश्रुधुराचा आणि पाण्याच्या फवाऱ्यांचा वापर केला. काही ठिकाणी पोलिस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाल्याचे वृत्त आहे.

जायकवाडी प्रकल्पाच्या कालव्यांतून 5 नोव्हेंबरपासून पहिले आवर्तन सुरु करणार

जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण डाव्या व उजव्या कालव्यांमधून रब्बी हंगामासाठी पहिले आवर्तन ५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज जाहीर केला. कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविण्यास प्राधान्य देऊन 'टेल टू हेड' पद्धतीने पाणीवाटप करावे. तसेच जानेवारीमध्ये पाण्याच्या उपलब्धतेचा फेरआढावा घेऊन अतिरिक्त आवर्तनाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयात जलसंपदामंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जायकवाडी प्रकल्प, पैठणच्या सन २०२६-२७ या वर्षातील कालवा सल्लागार समितीची बैठक झाली. बैठकीस खासदार संदिपान भुमरे, आमदार सर्वश्री प्रकाश सोळंके, राजेश टोपे, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, रत्नाकर गुट्टे, विठ्ठलराव लंघे पाटील, प्रतापसिंह पाटील, अंबादास दानवे, अमरसिंह पंडित, राहुल पाटील, नारायण कुचे, हिकमत उढाण, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेंद्र धोडपकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जलसंपदा विभागाने प्रकल्पातील पाण्याची उपलब्धता, सिंचन क्षेत्र आणि प्रस्तावित आवर्तनांचे सादरीकरण केले. आवर्तन म्हणजे कालव्यातून शेतीसाठी ठराविक कालावधीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याची पाळी होय. प्रारूप नियोजनानुसार पैठण डाव्या व उजव्या कालव्यासाठी रब्बी हंगामात प्रत्येकी तीन आणि उन्हाळी हंगामात प्रत्येकी एक, अशी चार



आवर्तने प्रस्तावित होती. रब्बीसाठी १७.४८ टीएमसी व उन्हाळ्यासाठी ४.५९ टीएमसी असा एकूण २२.०७ टीएमसी संभाव्य पाणीवापर अपेक्षित आहे. रब्बी हंगामात सुमारे ५८ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ अपेक्षित असून, त्यात प्रामुख्याने चारा व भुसार पिकांचा समावेश आहे.

प्रारंभी पहिले आवर्तन १५ नोव्हेंबरपासून प्रस्तावित होते. मात्र दुष्काळी परिस्थिती, जमिनीतील ओलाव्याचा अभाव आणि पिकांची गरज लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनी पाणी लवकर सोडण्याची मागणी केली. त्यानुसार ५ नोव्हेंबरपासून पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी कालव्यांची आवश्यक साफसफाई व दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जलसंपदामंत्र्यांनी दिले. दोन आवर्तनांमधील अंतर १५ दिवस किंवा गरजेनुसार तीन आठवड्यांपर्यंत ठेवून सुधारित नियोजन करण्याच्याही सूचना त्यांनी दिल्या.

सिंचनाचे नियोजन करताना केवळ प्रचलित लाभक्षेत्राची आकडेवारी न वापरता प्रत्यक्ष पेरणी झालेल्या क्षेत्राची माहिती विचारात घ्यावी. जलसंपदा व कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील आठ दिवसांत संयुक्तपणे पडताळणी करून मागील व चालू वर्षातील खरीप आणि रब्बी हंगामातील पीकक्षेत्राची तुलना करावी. त्यानुसार पाण्याची गरज निश्चित करण्याचे निर्देश डॉ. विखे पाटील यांनी दिले.

पिण्याच्या पाण्यासाठी ऑगस्ट २०२७ अखेरपर्यंत आवश्यक आरक्षण आणि १० टक्के राखीव साठा विचारात घेऊन सिंचनाचे नियोजन करण्यात येत आहे. दोन आवर्तनांनंतर जानेवारीमध्ये पाण्याचा प्रत्यक्ष वापर व शिल्लक साठ्याचा फेरआढावा घ्यावा. आवश्यकतेनुसार मार्चमध्येही उपलब्धतेचा विचार करून अतिरिक्त आवर्तनाबाबत निर्णय घेता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

परभणी आणि माजलगावसह कालव्याच्या शेवटच्या टोकावरील लाभक्षेत्रात पाणी पोहोचण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी मांडल्या. त्यावर डॉ. विखे पाटील यांनी 'टेल टू हेड' पद्धतीने पाणीवाटप करण्याचे निर्देश दिले. अनधिकृत पाणीउपसा, जोडण्या व मोटारींवर कारवाई करावी. आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण घेऊन शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचेल, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

गोदावरीवरील सात बॅरेजेसमध्ये पाणी सोडण्याचे नियोजन

गोदावरी नदीच्या खालच्या प्रवाहातील सात बॅरेजेसमध्ये पाणी उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. या बॅरेजेसमध्ये पाणी सोडल्यास नदीकाठच्या गावांना लाभ होणार असल्याचे लोकप्रतिनिधींनी सांगितले. त्यावर पहिल्या किंवा दुसऱ्या आवर्तनादरम्यान बॅरेजेसमधील पाणीसाठा वाढविण्याची शक्यता तपासून नियोजन करावे. उन्हाळ्यातील पाण्याची गरज आणि बाष्पीभवनामुळे होणारी घट विचारात घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश डॉ. विखे पाटील यांनी दिले.

शेतकऱ्यांच्या पिकांसाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देताना पिण्याच्या पाण्याचे आरक्षण, भविष्यातील गरज आणि धरणातील उपलब्ध साठा यांचा समतोल राखावा. पाण्याचा अपव्यय टाळून प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचविण्यास प्राधान्य द्यावे, असेही जलसंपदामंत्र्यांनी सांगितले.

सराफ व्यावसायिकाचं भरदिवसा इनोव्हातून अपहरण, सर्वत्र खळबळ; पोलीस तपासात धक्कादायक ट्विस्ट, तेलंगणा कनेक्शन

बुलढाणा : जिल्ह्यातील देऊळगाव राजा तहसील कार्यालयासमोरून तालुक्यातील देऊळगाव (Buldhana) मही येथील रहिवासी असलेले आणि योगीराज ज्वेलर्सचे मालक अनिरुद्ध शिंगणे यांचे अपहरण केल्याची खळबळजनक घटना घडली. सराफा व्यापारी असलेल्या 28 वर्षे युवकाचं इनोवामधून आलेल्या चार जणांनी अपहरण केलं. दुपारी एक ते दीडच्या सुमारास फिल्मी स्टाईल अपहरणामुळे देऊळगाव राजा शहरात खळबळ उडाली आहे. मात्र, पोलिसांनी (Police) या घटनेचा तपास सुरू केला असता धक्कादायक ट्विस्ट पाहायला मिळाला.

अपहरणाच्या घटनेनंतर तरुणाच्या नातेवाईकांनी देऊळगाव राजा शहर पोलिसात तक्रार दिली आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या अपहरण नाट्यामुळे देऊळगाव राजासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अपहरणकर्त्यांची इनोवा कार सीसीटीव्हीत कैद झाली असून पोलिसांनी तातडीने तपाासाची चक्रे फिरवली. अनिरुद्ध शिंगणे हे व्यवसायाचा ज्वेलर्स व बांधकाम व्यावसायिक असल्याने हे अपहरण कोणी व का केलं? याबद्दल माहिती घेत पोलिसांनी जलद गतीने तपास सुरू केला. त्यामुळे, अवघ्या काही तासांतच पोलिसांना इनोव्हा कार आणि अपहृत युवक आढळून आले आहेत. तर, या घटनेत चांगलाच ट्विस्ट दिसून आला, अधिक तपास सुरू आहे.

शहरातील ज्वेलर्स अपहरण प्रकरणात मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. अपहरणकर्त्यांची इनोव्हा कार काही वेळापूर्वीच साखरखेर्डा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लव्हाळा फाटा येथे आढळून आली, देऊळगावा राजा पोलिसांनी तपासादरम्यान ही कार ताब्यात घेतली असून अपहृत युवक सुरक्षित असून अपहरणकर्ते हे तेलंगणा पोलीस असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, त्यांनी संबंधित युवक व्यापाऱ्याला कुठल्या प्रकरणात ताब्यात घेतलं आहे, तसेच घेऊन जात होते याबद्दल स्थानिक पोलीस किंवा जिल्हा पोलिसांना कुठलीही माहिती दिली नाही. त्यामुळे, हे संपूर्ण अपहरण नाट्य संशयास्पद वाटत असून अनेक प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीत आहे. सध्या अपहरणकर्ते पोलीस आणि युवक अनिरुद्ध शिंगणे पोलिसांच्या ताब्यात असून अधिक तपास केला जात आहे. दरम्यान, तेलंगणा पोलिसांनी कुठलीहीही माहिती न देता या युवकाला ताब्यात का घेतलं? याबद्दल आता पोलीस चौकशी करत आहेत, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी दिली.

बॉम्ब ठेवल्याचा ईमेल आल्याने न्यायालय परिसरात मोठी खळबळ उडाली

बॉम्ब शोध पथक आणि श्वान पथकाद्वारे तपासणी



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी**राज्यातील बहुतांश जिल्हा व जिल्हा सत्र न्यायालयाला बॉम्ब निवडून देण्याच्या धमकीचा ई-मेल दिनांक 2 नोव्हेंबर सोमवार रोजी प्राप्त झाला. यामध्ये परभणी जिल्हा व सत्र न्यायालयाचा समावेश असल्याचे संपूर्ण जिल्ह्यात पोलीस दलामध्ये मोठी खळबळ मिळाली असून न्यायालय परिसरात सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास बॉम्बशोधक पथक पथक जिल्हा व सत्र न्यायालय आवारात दाखल झाले सर्वांना बाहेर काढण्यात आले आणि दुपारी पाहुणे चार वाजेपर्यंत कसून तपासणी करण्यात आली दुपारी पावणेचार नंतर सर्वांनी सुटके श्वास सोडला याबाबत अधिक माहिती अशी की राज्यातील बहुतांश जिल्हा व सत्र न्यायालयाची इमारत बॉम्ब निवडून देण्याची धमकी दिनांक 2 नोव्हेंबर सोमवार रोजी ईमेलद्वारे देण्यात आली होती परभणी जिल्हा न्यायालय सुद्धा बॉम्बे उडून देण्याची धमकी देणारा ईमेल मिळाला होता पोलिसांना ही माहिती मिळताच पोलीस दलाने साडेअकरा वाजता च्या सुमारास तातडीने इमारतीचा ताबा घेतला व न्यायालय परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता न्यायालयातील सर्व वकील कर्मचारी नागरिक यांना न्यायालयाच्या बाहेर काढण्यात आले डॉग स्कॉड आणि बॉम्बशोधक पथक घटनास्थळी पोहोचले इमारत परिसरात कसून तपासणी करण्यात आली न्यायालयाचा गेट देखील बंद करण्यात आला होता आणि त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकावर लक्ष ठेवले जात होते परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमा झाली होती गर्दीवर पोलीस कर्मचारी नियंत्रण ठेवत होते नेमके काय घडले याची नागरिकांना काहीच कल्पना नव्हती त्यामुळे सर्वत्र गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते मात्र पावणे चार वाजेपर्यंत कसं तपासणी केल्यानंतर बॉम्बची केवळ अफवा असल्याने स्पष्ट झाले

नवीन जलवाहिन्या टाका, पाणीपुरवठा सुरळीत करा : भास्कर आबा दानवे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना प्रतिनिधी : जालना शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील पाणीटंचाई दूर करून नागरिकांच्या नागरी समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

प्रभागातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पश्चिम बाजूस नव्याने विकसित झालेल्या द्वारका नगर, रॉयल नगर आणि भगत नगर या परिसरांत महानगरपालिकेने जलवाहिनी टाकली आहे. मात्र, अद्याप या भागात पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, या परिसरात नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी दानवे यांनी केली आहे.प्रभागातील विविध भागांत अनियमित आणि अपुरा पाणीपुरवठा होत आहे. जलवाहिनी नादुरुस्त झाल्यास



किंवा गळती लागल्यास दुरुस्तीच्या कामाला १५ ते २० दिवसांचा कालावधी लागत असल्याने पाणीपुरवठा विस्कळीत होतो. तसेच, दुरुस्तीसाठी रस्ते खोदल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. उघडे खड्डे आणि अपूर्ण कामांमुळे रात्रीच्या वेळी अपघात होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. फाईन लिव्हिंग सोसायटी, स्काय बर्ड सोसायटी (जिजामाता कॉलनी), म्हाडा कॉलनी (शिवाजीनगर), ढवळेश्वर आणि मानकरतन नगर या भागांत अद्याप जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या नाहीत. दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे पाणीटंचाई अधिक तीव्र होत असल्याने या भागांत नवीन जलवाहिन्या टाकण्याची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत, अशी मागणी भास्कर आबा दानवे यांनी केली आहे. तसेच, जलवाहिनी दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून नागरिकांची गैरसोय टाळावी, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

सिल्लोड येथे पती-पत्नीला मारहाण

सिल्लोड : रस्त्यात उभे असलेल्या दोघांना दुचाकी जाण्यासाठी बाजूला होण्यास सांगितल्याच्या कारणावरून दोघांनी पती-पत्नीला शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. यातील एकाने पत्नीला चापटाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता सिल्लोड शहरातील शिक्षक कॉलनी परिसरात घडली. याप्रकरणी अखलाक (पूर्ण नाव माहीत नाही) आणि शाहरुख पिंजारी या दोघांविरुद्ध सिल्लोड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी माधुरी दांडगे यांचे पती पाण्याचा जार आणण्यासाठी दुचाकीवरून जात होते.

मनपा कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात दुपारनंतर स्थगिती; दिवाळीपूर्वीच दोन वेतन टाकण्याचे आश्वासन

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

परभणी**लेखी आश्वासनानंतर देऊन पूर्तता न केल्याने महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी सोम दिनांक 2 नोव्हेंबर पासून सोमवारपासून कामं आंदोलन करणे होते त्यानंतर प्रशासनाने संप काळातील वेतन थकीत दोन महिन्याचे वेतन सेवानिवृत्ती वेतन आदित्य दिवाळीपूर्वीच आधार करण्याचे आश्वासन दिले व दुपारनंतर आंदोलन स्थगिती देऊन मागे घेण्यात आले . याबाबत अधिक माहिती अशी की परभणी शहर महानगरपालिका अधिकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यासाठी 28 जुलै ते 11 ऑगस्ट या कालावधीत काम बंद आंदोलन केले होते त्यानंतर तडजोडीप्रमाणे मनपा प्रशासनाने लेखी आश्वासन दिले



मात्र आश्वासनाची पूर्तता केली नसल्यामुळे त्यानंतर आक्रमक झालेल्या कर्मचाऱ्यांनी 2 नोव्हेंबर पासून काम आंदोलन करण्याचा इशारा दिला होता सोमवार सकाळी आंदोलनाला सुरुवात झाली होती आणि दिवाळीत कर्मचाऱ्यांच्या आंदोलन सुरू केल्याने शहराची स्वच्छता व इतर मूलभूत सुविधा प्रश्न उभा टाकणार होता या सर्व बाबी लक्षात घेता मनपा प्रशासनाने मध्यस्थी करत संप काळातील वेतन थकीत वेतन सेवानिवृत्ती वेतन आदी दिवाळीच्या पूर्वी देण्याचे संघटनेला आश्वासन दिले याच विश्वास आश्वासनानंतर काम बंद आंदोलन मागे घेण्यात आले अशी माहिती कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आली



आ. संजय गायकवाडांच्या मतदारसंघात 12 वर्षांत तब्बल 288 शेतकऱ्यांची टोकाची पावलं

मुंबई : 'शेतकरी आत्महत्या करणाऱ्यांच्या अंत्यसंस्काराला कोणीही जाऊ नये', असं वादग्रस्त विधान बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी अलीकडेच केलं होतं. त्यांच्या या विधानावरून मोठा वादही निर्माण झाला. मात्र, आता समोर आलेल्या माहितीनुसार, 2015 ते 2026 या कालावधीत आमदार संजय गायकवाड यांचा मतदारसंघ असलेल्या बुलढाणा आणि मोताळा (Buldhana and Motala) तालुक्यात तब्बल 288 शेतकरी (Farmers) आत्महत्या झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, हे दोन्ही तालुके आ.संजय गायकवाड यांच्या मतदारसंघात येतात. त्यामुळे त्यांच्या विधानाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आलाय. शिवाय आमदार गायकवाडांच्या विधानानंतर शेतकरी आत्महत्यांचा आकडा देखील चर्चेत आला आहे.

"आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंत्यसंस्काराला कोणीही जाऊ नये...!", असं विधान गायकवाड यांनी केलं होतं. त्यांच्या या विधानावरून राजकीय वर्तुळात आणि समाजमाध्यमांवर मोठी चर्चा सुरू झालीय. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशीलता दाखवण्याची गरज असताना अशा विधानांमुळे नव्या वादाला तोंड फुटलं. मात्र, आता याच बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी समोर आली आहे. 2015 ते 2026 या कालावधीत बुलढाणा आणि मोताळा या दोन तालुक्यांत तब्बल 288 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती आहे. म्हणजेच या दोन तालुक्यांतील शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न किती गंभीर आहे?, याची कल्पना या आकड्यावरून येते. शेतीचा वाढता खर्च, निसर्गाची अनिश्चितता, पिकांचं नुकसान, कर्जाचा भार आणि शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाची अनिश्चितता. या सगळ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. मात्र, प्रत्येक आत्महत्येमागची नेमकी कारणं स्वतंत्रपणे तपासणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

दरम्यान, एकीकडे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंत्यसंस्काराबाबत वादग्रस्त विधान, तर दुसरीकडे त्याच मतदारसंघातील शेतकरी आत्महत्यांचा मोठा आकडा, त्यामुळे आता प्रश्न उपस्थित होतोय, की शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत? संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत, पीकविमा, कर्जाबाबत मार्गदर्शन आणि मानसिक आधार मिळतोय का? केवळ आत्महत्येनंतर मदतीची घोषणा करण्यापेक्षा आत्महत्या होऊच नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याची गरज आहे, अशी लोकभावना आता व्यक्त केली जात आहे.

बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड (Sanjay Gaikwad) यांनी शेतकरी आत्महत्या विषयावर उद्विग्न प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. शेतकरी कुटुंबाला वाऱ्यावर सोडून आत्महत्या करतो. त्याला काही अडचण असेल तर त्याने आमदार, खासदार यांना चिठ्ठी लिहावी. आम्ही सर्व मिळून त्याची मदत करू. असा सल्लाही आमदार संजय गायकवाड यांनी यावेळी दिलाय. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या अंत्यविधीला किंवा मयताला कोणीही जाऊ नये. जेव्हा लोकांना समजेल की, आपल्या मृतदेहाला जनावरे खातात आणि आपल्या मृतदेहाचे काय होते, तेव्हा ते आत्महत्या करणे थांबवतील. त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, काही अडचण असल्यास त्यांनी आत्महत्या न करता सरकारला, आपल्या आमदार किंवा खासदारांना चिठ्ठी लिहून सांगावे. सर्वजण मिळून मदतीला धावून येतील. शेतकरी आत्महत्या करून आपल्या लहान मुलांचे आणि पत्नीचे आयुष्य उद्ध्वस्त करतात, असे संजय गायकवाड यांनी म्हटले होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

13.96 कोटींची महासाबर चोरी

तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच सायबर गुन्हेगारांचे जाळे किती भयानक रूप धारण करत आहे, याचे एक अत्यंत धक्कादायक उदाहरण सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या फसवणुकीच्या प्रकरणात समोर आले आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या बँक खात्यांमधून पैसे काढण्याच्या सायबर चोऱ्या तर आपण नेहमीच ऐकतो; परंतु थेट बँकेच्या सुरक्षित कम्युनिकेशन चॅनेलमध्ये आणि आरबीआयच्या (RBI) ट्रेझरी खात्यात फेरफार करून तब्बल १३.९६ कोटी रुपयांची रक्कम आरटीजीएसद्वारे (RTGS) पळवल्याची घटना ही संपूर्ण बँकिंग क्षेत्राला हादरवून सोडणारी आहे. या गंभीर प्रकरणाचा छडा लावून महाराष्ट्र सायबर पोलिसांनी मुख्य आरोपी मेहुल सिमारिया यास बेड्या ठोकल्या आहेत, ही पोलिसांच्या उच्च तांत्रिक तपासाची मोठी यशोगाथा आहे. गत ऑक्टोबर महिन्यात १५ ते १७ या अवघ्या तीन दिवसांत घडलेल्या या प्रकारात, आरटीजीएस व्यवहार प्रक्रियेत छेडछाड करून तब्बल १८७ अनधिकृत व्यवहारांद्वारे १३.९६ कोटी रुपयांची रक्कम देशभरातील ३६ वेगवेगळ्या बँकांमधील १०७ लाभार्थी खात्यांमध्ये वळवण्यात आली. बँकेच्या अंतर्गत सुरक्षा यंत्रणांना गुंगारा देऊन इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी लांबवणे हे केवळ सायबर गुन्हेगारांचे धाडस नसून, बँकेच्या सुरक्षा यंत्रणेतील त्रुटींवर बोट ठेवणारे आहे. या गुन्ह्यातून १ कोटी रुपयांची रक्कम इतर खात्यांमध्ये जाण्यापूर्वी गोठवण्यात पोलिसांना यश आले असले, तरी या रॅकेटचे जाळे किती मोठे आहे, याचा शोध घेणे यंत्रणेसमोर आव्हान असणार आहे. डिजिटल बँकिंग आणि ऑनलाईन व्यवहारांवर नागरिकांचा विश्वास टिकून राहण्यासाठी वित्तीय संस्थांच्या सुरक्षा भिंती अभेद्य असणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारच्या हाय-टेक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी बँकांनी आपल्या पेमेंट प्रोसेसिंग सिस्टीमचे ऑडिट अधिक कडक करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र सायबर पोलिसांनी या गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये कडक कलमांखाली गुन्हा दाखल करून दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे. या प्रकरणातील इतर सहकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना लवकरात लवकर कायद्याच्या कक्षेत आणणे आणि बँकिंग व्यवस्थेतील पळवाटा बंद करणे, हीच या गुन्ह्यावरील खरी जरब ठरेल.

"राहुल बाबा, परदेशात फिरुन निवडणुका नाही जिंकता येत; देशात येऊन घाम गाळावा लागतो!" अमित शाह यांची राहुल गांधींवर टीका

हैदराबाद : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह (Amit Shah) यांनी सोमवारी हैदराबादमध्ये भाजपच्या 'लोकतंत्र बचाओ, अराजकता हटाओ' या भव्य पदयात्रेला संबोधित करताना काँग्रेस पक्ष आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली. "काँग्रेस पक्ष सध्या स्वतः व्हेंटिलेटरवर आहे. व्हेंटिलेटरवर असलेला हा पक्ष पंतप्रधान मोदींसोबत मॅरेथॉन कशी काय पळू शकणार ? राहुल जी, मोदीजींना तर बाजूलाच ठेवा, आमचा तेलंगणा भाजप युवा मोर्चाचा अध्यक्ष जरी समोर उभा ठाकला, तरी तो तुमचा पराभव करण्यासाठी पुरेसा आहे," असा जोरदार टोला अमित शाह यांनी लगावला.

हैदराबादमधील प्रसिद्ध टँक बंड परिसरात स्वामी विवेकानंद आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांच्या मार्गावर हा विशाल मोर्चा काढण्यात आला. या पदयात्रेच्या समारोपानंतर गृहमंत्री अमित शाह यांनी हजारो कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तत्पूर्वी, त्यांनी चारमिनार परिसरातील ऐतिहासिक श्री भाग्यलक्ष्मी माता मंदिरात जाऊन मनोभावे पूजा केली आणि देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली अर्पण केली. "जर त्या काळा d्यात सरदार पटेल यांनी निजामाला गुडघे टेकवायला लावले नसते, तर आजचा हैदराबाद भारताचा भाग कधीच बनू शकला नसता," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

दिल्लीतील रामलीला मैदानावर विरोधी पक्षांनी घेतलेल्या महासभेवर निशाणा साधत शाह म्हणाले, "काल दिल्लीत राहुल गांधी यांनी एक रॅली काढली आणि तिला 'व्होट बचाओ' रॅली असे नाव दिले. पण ती कोणतीही मते वाचवणारी रॅली नव्हती, तर ती थेट 'घुसखोर बचाओ' (Save Infiltrators) मोहीम होती." मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेचे समर्थन करताना त्यांनी सांगितले की, बोगस मतदानाच्या जोरावर निवडणुका जिंकण्याचे काँग्रेसचे मनसुबे आहेत.



मतदार याद्यांच्या शुद्धीकरणावर (SIR) अधिक बोलताना अमित शाह म्हणाले, "एकाच व्यक्तीची दोन-दोन ठिकाणी नावे असतील, तर त्यातील एक नाव रद्द व्हायला हवे की नको? राहुल बाबांच्या पोटात नेमके याच गोष्टीमुळे दुखत आहे. आज देशात तब्बल ३ कोटी एवढे बोगस मतदार आहेत, जे प्रत्यक्षात अस्तित्वातच नाहीत. हे सर्वच्या सर्व बांगलादेशी घुसखोर आहेत. काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष याच घुसखोरांना पाठीशी घालण्यासाठी एसआयआरला (SIR) कडाडून विरोध करत आहेत, कारण हीच मंडळी त्यांची मुख्य व्होट बँक आहे. पण मी आज स्पष्ट शब्दांत सांगतो, राहुल जी आणि रेवंत रेड्डी यांनी कितीही जोर लावला तरी भाजप एकाही घुसखोराला मतदार यादीत टिकू देणार नाही आणि प्रत्येक घुसखोराला हुडकून देशाबाहेर हाकलून लावेल."

ऐतिहासिक विजयांचे दाखले अन् काँग्रेसच्या आरोपांना उत्तर

भाजप केवळ मतदार याद्यांच्या बदलांमुळे (SIR) जिंकतो या राहुल गांधींच्या आरोपांचा अमित शाह यांनी तीव्र निषेध केला. भूतकाळातील निवडणुकांचे दाखले देत शाह म्हणाले, "२०१४ आणि २०१९ मध्ये जेव्हा मोदीजी जिंकले, तेव्हा कुठे SIR होते? जनतेच्या मतांमुळे मोदीजी जिंकले. २०२४ नंतर आम्ही महाराष्ट्रात ऐतिहासिक बहुमताने जिंकलो, हरियाणामध्ये मोठा विजय मिळवला, ३० वर्षांनंतर दिल्लीत विजय मिळवला, बिहारमध्ये जिंकलो आणि बंगालमध्ये तर 'दीदीं'चे राजकीय अस्तित्व संपुष्टात आले आहे."

संसदेत समोरासमोर चर्चेचे खुले आव्हान

विरोधक संसद चालू देत नसल्याचा आरोप करत शाह यांनी राहुल गांधींना थेट संसदेत चर्चेचे आव्हान दिले. "तुम्ही देशाला अराजकतेकडे नेण्याचा प्रयत्न करत आहात. मी हैदराबादच्या भूमीवरून तुम्हाला थेट आव्हान देतो की, आम्ही संसदेचे विशेष अधिवेशन बोलवायला तयार आहोत. या आणि संसदेच्या पटलावर चर्चा करा. पण तुम्ही चर्चेत सहभागी होणार नाही, कारण काँग्रेसला केवळ गदारोळ घालूनच चर्चेत राहायचे आहे," असे शाह म्हणाले.

"मॉक पार्लमेंटमध्ये तरी पंतप्रधान बना, सोनियाजींना शांती मिळेल"

काँग्रेसने आयोजित केलेल्या 'मॉक पार्लमेंट' (चावडी संसद) वर उपरोधिक टीका करताना अमित शाह म्हणाले, "राहुल जी, तुम्ही दोन दिवसांपूर्वी मॉक पार्लमेंट घेतली. मला विचारले असते तर मी सल्ला दिला असता की विरोध पक्षनेते राहण्याऐवजी त्या मॉक पार्लमेंटमध्ये तरी किमान एकदा स्वतःला पंतप्रधान घोषित करून टाका. कारण खऱ्या संसदेत तर तुम्ही कधीच पंतप्रधान बनू शकणार नाही! किमान मॉक पार्लमेंटमध्ये तरी तुम्ही पंतप्रधान झालात तर सोनियाजींच्या मनाला थोडे समाधान आणि शांती मिळेल." शेवटी, "परदेशात जाऊन आणि काही महिने बाहेर फिरून निवडणुका जिंकता येत नाहीत. देशात राहून जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी घाम गाळावा लागतो," असा सल्लाही त्यांनी राहुल गांधींना दिला.

काळ्या बाजारात जाणारा 500 पोते तांदूळ पकडला

कृषी उत्पन्न बाजार समिती समोर कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी**परभणी शहरात अनेक दिवसांपासून काळा बाजारात राहण्याची धान्याची विक्री होत असल्याचं अनेक प्रकरण घडले असून कोट्यावधी रुपयाचा घोटाळा राशनच्या धान्य मध्ये झाला यामध्ये अनेक राशन दुकानदार व अनेक कर्मचारी अधिकारी यामध्ये अडकले होते एवढं होऊन सुद्धा काळा बाजारातला हा राशन धान्याचा प्रकार कमी व्हायला तयार नाही असाच एक प्रकार शहरातील काळ्या बाजारात विक्रीसाठी घेऊन जात असलेल्या रेशनचा तांदळाने भरलेल्या ट्रक कोतवाली पोलिसांच्या विशेष पथकाने कारवाई करून पकडला. कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील धर्म काट्यावर ही कारवाई करण्यात आली ट्रकमध्ये तांदळाचे तब्बल 500 कट्टे आढळून आल्याने शहरात फार मोठी खळबळ वळले आहे. अधिक माहिती अशी की कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी राहुल चिंचाने यांना गुप्त बातमीदार मार्फत संबंधित ट्रकमध्ये रेशनचा तांदूळ असून तो काळा बाजारात विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याची माहिती मिळाल्यावर तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आले त्यानंतर पीएसआय केंद्र साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील धर्म काट्यावर त्वरित जलद गतीने जाऊन वाहन क्रमांक एम एच झिरो चार जीआर 49 झिरो सहा या क्रमांकाच्या ट्रकला ताब्यात घेतले पोलिसांनी ट्रक चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव रशीद असे असल्यास सांगितले ट्रक मधील तांदळाबाबत विचारणा केली असता त्यांनी बिलाची छायांकित फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया खरेदीचे कागदपत्र तसेच डी आर आर ट्रेडर्सचे बिल दाखवले मात्र प्रत्यक्ष तपासणी द्वारे ट्रकमध्ये तांदळाचे पाचशे कट्टे आढळून आले त्यामुळे पोलिसांनी संबंधित कागदपत्राची पडताळणी करून पुढील चौकशीसाठी ट्रक पोलीस ठाण्यात आणला ही कार्यवाही पीएसआय केंद्र साहेब राहुल चिंचाणे प्रेम चव्हाण महेश पांगरकर प्रमोद पुरी नेतामआणि गीते यांच्या विशेष पथकाने केली रेशनचा तांदूळ नेमका आणला कुठून तो कोणाला कोणत्या कारणासाठी पाठवण्यात येत आला होता तसेच या व्यवहारामागे आणि कोणाकोणाचा हात असल्याचा किंवा सहभाग असल्याचा कसून तपास पोलीस करत आहेत रेशनच्या धान्याची काळ्या बाजारात होणारी विक्री याचा तपासता महत्त्वाचा ठरणार असून या प्रकरणातील कार्यवाहीकडे सर्व सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष वेधले असून सर्वसामान्य नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून अपेक्षा आहे की काळा बाजारात जाणारे धान्य याच्यावर रोख लावून हा प्रकार बंद झाला पाहिजे आणि गोरगरिबाच्या तोंडचे अन्न पळणाऱ्या नराधमांना चांगलाच धडा शिकवा अशी अपेक्षा सर्व नागरिकांकडून केली आहे .

विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी! स्वयं परीक्षेची नोंदणी मुदत 5 नोव्हेंबरपर्यंत आजच करा अर्ज

मुंबई : नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ने स्टडी वेब्स ऑफ ॲक्टिव्ह लर्निंग फॉर यंग ॲस्पायरिंग माइंड्स (स्वयम्) जुलै सत्र 2026 परीक्षेसाठी नोंदणी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी. स्वयं जुलै सत्र परीक्षा २०२६ची नोंदणीची अंतिम मुदत वाढवून ते आता 5 नोव्हेंबरपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणखी एक संधी उपलब्ध होणार आहे.

स्वयं जुलै 2026 सत्र परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA) ने 31 ऑक्टोबर निश्चित केली होती , परंतु आता ती 5 नोव्हेंबर 2026 (रात्री 11.50) पर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी नोंदणी करायची असेल त्यासाठी अर्ज कसा करायचा ते आपण जाणून घेणार आहोत. दरम्यान, अर्जातील दुरुस्तीची विंडो 6 नोव्हेंबर 2026 रोजी उघडेल. ज्या उमेदवारांनी अद्याप परीक्षेसाठी अर्ज केलेला नाही, ते आता exams.nta.nic.in/swayam या अधिकृत पोर्टलद्वारे आपला अर्ज सादर करू शकतात .

अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया : अर्ज दाखल करण्यासाठी तुम्हाला अधिकृत वेबसाईटवर जावे लागेल. त्यानंतर नोंदणी प्रक्रिया करून उमेदवारांना त्यांच्या अर्जात बदल करण्याचा पर्याय दिला जाईल. अर्ज शुल्क भरण्याची अंतिम तारीख ही देखील 5 नोव्हेंबर 2026 पर्यंत असणार आहे.

कर्जमाफीच्या यादीतून एकही शेतकरी सुटणार नाही, प्रत्येक जिल्ह्यात 10 ते 15 हजार शेतकऱ्यांची केवायसी अपूर्ण : चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : कर्जमाफीच्या यादीतून एकाही शेतकऱ्याचे नाव सुटणार नाही, असे मत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. KYC पूर्ण होऊन याद्या जात आहेत असेही बावनकुळे म्हणाले. कर्जमाफीच्या निर्णयाची अंमलबजावणी करु असेही ते म्हणाले. 10 ते 15 हजार शेतकरी कुटुंबाचे प्रत्येक जिल्ह्यात केवायसी झालं नाही, हे खरं आहे असंही ते म्हणाले.

शेतकरी कर्जमाफीची योजना आम्ही पूर्ण करु

मृत आई-वडिलांच्या नावाने अकाउंट आहे, ते मुलाच्या नावानं करणे यासाठी वेळ लागत आहे. शेतकरी कर्जमाफीची योजना आम्ही पूर्ण करु कुणालाही सोडणार नाही असेही बावनकुळे यावेळी म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतली आहे. याबाबत देखील बावनकुळे यांना प्रसारमाध्यमांनी विचारले. यावेळी ते म्हणाले की, उच्चस्तरीय बैठक झाली असेल, त्यामध्ये जे ठरलं असेल त्यावर आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वरिष्ठ नेते बसून निर्णय करतील असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

नागपूर बिश्नोई गँग धमकी प्रकरणी पोलीस चौकशी करत आहेत

नागपूर बिश्नोई गँग धमकी प्रकरणी देखील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. धमकी संदर्भात पोलीस चौकशी करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची दखल घेतली आहे. यावर आम्ही कारवाई करत आहोत असेही बावनकुळे म्हणाले. कुठल्याही दबावाखाली स्थगिती होत नाही, एखाद्या वेळी कारवाईमध्ये तांत्रिक बाबी राहून जातात त्यामुळे स्थगिती मिळते, अशी स्थगिती कोणाला देता येत नाही. तुकाराम मुंढे यांच्या तपासणीत काही आलं असेल, काही बाबी राहून गेल्या असतील म्हणून थांबवलं असेल, असं कोणी तुकाराम मुंढेंना थांबवत नाही, त्यांच्या कारवाईच्यामध्ये कोणी येत नाही असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

दुष्काळाच्या आठ महिन्यात शेतकऱ्यांना सक्तीच्या वसुलीसाठी तगादा लावू नका

फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली होत असल्या संदर्भात देखील बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. दुष्काळाच्या आठ महिन्यात शेतकऱ्यांना तगादा लावू नका, पतसंस्था फायनान्स कंपन्या खासगी बँका कोणीही शेतकऱ्यांना वेठीस धरू नका. तुमचे पैसे नंतर भेटतील पण शेतकऱ्यांना या काळात त्यांच्या आत्महत्या होतील असं काही करू नका अशा सूचना दिल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. जर कुणी असं करत असेल तर शासन म्हणून कारवाई करु असेही ते म्हणाले. जिल्हा परिषद निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरुन चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावर टीका केली. विजय वडेट्टीवार नौटंकी करत आहेत. ते 27 टक्के आरक्षण कुठे गेलं? 27 टक्के आरक्षण उद्धव ठाकरे यांच्या काळात गेलं असेही बावनकुळे म्हणाले. विजय वडेट्टीवार खोटारडेपणा करत आहेत. 27 टक्के आरक्षण परत मिळण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्याचे बावनकुळे म्हणाले. 27 टक्केचा निर्णय होत राहील पण 50 टक्के आरक्षण घेऊन निवडणुका घ्या असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, सरकार तशी तयारी करत आहे असेही बावनकुळे म्हणाले.

भांडुपमध्ये लग्नाच्या जेवणातून 30 जणांना विषबाधा; जोडप्यासह वऱ्हाडी रुग्णालयात दाखल

मुंबई : लग्नसमारंभातील भोजनानंतर नवविवाहित जोडप्यासह वऱ्हाडी मंडळींना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना भांडुप-नाहूर परिसरात घडली आहे. 1 नोव्हेंबर रोजी रात्री झालेल्या या प्रकारात सुमारे 27 ते 30 जणांना त्रास झाला. त्यांना मुलुंड आणि विक्रोळी येथील विविध रुग्णालयांत उपचारासाठी दाखल करण्यात आले. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

नाहूर पश्चिम येथील नालंदा बुद्ध विहार हॉलमध्ये 1 नोव्हेंबर रोजी लग्नसमारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात जवळपास 400 जणांनी भोजन केले होते. मात्र, शेवटच्या पंगतीत जेवण केलेल्या 27 ते 30 जणांना काही वेळानंतर पोटदुखी, उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला.

रात्री सुमारे 11 वाजण्याच्या सुमारास त्रास वाढल्याने काही रुग्णांना मुलुंड येथील एम. टी. अग्रवाल महानगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर इतरांना मुलुंडच्या कामगार रुग्णालयात आणि विक्रोळी येथील पालिका रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.

रुग्णालयात दाखल झालेल्यांमध्ये लहान मुले, महिला आणि पुरुषांचा समावेश आहे. एका महिलेने स्वतःहून रुग्णालयातून सुटी घेतली असून, इतर रुग्णांवर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्यामुळे रुग्णांची प्रकृती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले. एम. टी. अग्रवाल रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजूसिंग राठोड यांनी सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती दिली. काही रुग्णांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून, इतरांवर उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर नवऱ्या मुलाच्या नातेवाईकांनी जेवणाचे कंत्राट घेतलेल्या केटरिंग व्यावसायिकाच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप केला आहे.

मात्र, विषबाधेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, पोलिसांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले असून, संबंधित यंत्रणांकडून आवश्यक ती कार्यवाही केली जात असल्याची माहिती दिली आहे.

दोन शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर रविकांत तुपकरांची क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक

नांदेडमध्ये श्रीराम फायनान्ससह बजाज फायनान्सची कार्यालये फोडली!

नांदेड : 'दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारात जाऊन जबरदस्ती वसुली कराल, महिलांना त्रास द्याल, तर एकही फायनान्स कंपनीचे कार्यालय शिल्लक ठेवणार नाही,' असा आक्रमक इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला होता. आता या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये (Nanded) क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे (Krantikari Shetkari Sanghatana) जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधवसह त्यांच्या कार्यकर्त्यांनी दोन खासगी फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयांची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. श्रीराम फायनान्स आणि बजाज फायनान्स या कंपन्यांच्या कार्यालयांना लक्ष्य करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे नांदेडमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

राज्यात दुष्काळाने शेतकरी, शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांचे जगणे कठीण झाले असताना मायक्रोफायनान्स आणि खासगी फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली सुरू असल्याचा गंभीर आरोप रविकांत तुपकर यांनी यापूर्वी केला होता. "वसुलीवाल्यांनो, शेतकऱ्यांच्या दारात याल, महिलांना त्रास द्याल, तर कपडे काढून फटके देऊ! सरकारने वेळीच आवरावे, अन्यथा जोरजबरदस्तीने वसुली करणाऱ्या कंपन्यांचे एकही कार्यालय शिल्लक ठेवणार नाही," असा इशारा त्यांनी दिला होता. नांदेड येथील चंद्रकांत शिंदे आणि लातूर येथील दत्तात्रय कुंभार या दोन शेतकऱ्यांच्या मृत्यूमागे मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या वसुलीचा दबाव असल्याचा आरोप करण्यात आला होता. या दोन्ही शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची रविकांत तुपकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सांत्वन केले होते. या घटनांच्या पार्श्वभूमीवर तुपकरांनी मायक्रोफायनान्स कंपन्या, खासगी फायनान्स कंपन्या आणि पतसंस्थांच्या वसुली पद्धतींविरोधात आक्रमक भूमिका जाहीर केली होती. दरम्यान, आज, 2 नोव्हेंबरला नांदेडमध्ये क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दोन फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयांची तोडफोड केल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटना व मायक्रो फायनान्स कंपन्या समोरासमोर येणार आणि राज्यात आंदोलन पेटणार असल्याचा इशारा नेत्यांनी दिला आहे.तुपकरांनी यापूर्वी दिलेल्या इशाऱ्याची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

आर्ट ऑफ लिव्हिंग हिंगोलीतर्फे भव्य सत्संग सोहळा उत्साहात संपन्न

ऋषी देवव्रत आणि आंतरराष्ट्रीय गायक सौरभ कौशल यांच्या उपस्थितीत रंगला भक्तिमय सोहळा



हिंगोली : आर्ट ऑफ लिव्हिंग हिंगोली परिवाराच्या वतीने महावीर नगर येथील सुखदा मंगल कार्यालयात भव्य सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला हिंगोली शहरातील नागरिक, महिला भगिनी, युवक तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगचे साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंगोली नगरपालिकेचे मा. नगराध्यक्ष श्री. दिलीप चव्हाण, सौ. राजमती मुटकुळे, श्री. माधव कोरडे, श्री. अविनाश चोंडे, दोडके सर, श्री. संजय सूर्यवंशी साहेब तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साधकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात करण्यात आली.

या सत्संग सोहळ्यात ऋषी देवव्रत यांच्या मार्गदर्शनातून उपस्थितांना अध्यात्म, ध्यान, साधना, सकारात्मक विचार आणि आनंदी जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तर आंतरराष्ट्रीय गायक सौरभ कौशल यांच्या भक्तिमय सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. भजन, संगीत आणि सत्संगाच्या माध्यमातून संपूर्ण सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणेतून ध्यान, प्राणायाम, योग आणि सत्संगाच्या माध्यमातून व्यक्तीच्या जीवनात आनंद, मनःशांती आणि सकारात्मकता निर्माण करण्याचे कार्य केले जात आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात मानसिक शांतता, आत्मिक समाधान आणि समाजातील एकोपा टिकवण्यासाठी अशा आध्यात्मिक उपक्रमांचे महत्त्व मोठे आहे.

या भव्य सत्संग सोहळ्याला महिला भगिनींचा विशेष उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, नागरिक आणि साधकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग हिंगोली परिवारातील सर्व साधक व सदस्यांनी परिश्रम घेतले. आध्यात्मिक विचारांची जोड देणारा आणि भक्ती, आनंद व सकारात्मकतेचा संदेश देणारा हा सत्संग सोहळा हिंगोलीकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

कर्जतमध्ये 100 एकरांवर उभारणार 'अनंत आश्रय'; 5 हजारांहून अधिक जणांना मिळणार निवारा

मुंबई : रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून नीता अंबानी यांनी आणखी एका मोठ्या सामाजिक उपक्रमाची घोषणा केली आहे. मुंबईजवळील कर्जत येथे 100 एकर क्षेत्रावर 'अनंत आश्रय' नावाची भव्य निवासी टाऊनशिप उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून अनाथ मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसह 5 हजारांहून अधिक गरजू नागरिकांना आयुष्यभरासाठी निवारा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

नीता अंबानी यांच्या हस्ते भूमिपूजन

रिलायन्स फाऊंडेशनच्या संस्थापक आणि अध्यक्षा नीता एम. अंबानी यांच्या पुढाकारातून हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. रविवारी त्यांच्या हस्ते 'अनंत आश्रय' प्रकल्पाचे भूमिपूजन आणि पायाभरणी समारंभ पार पडला. या प्रकल्पाचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे.

निवासासह आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा

'अनंत आश्रय'मध्ये केवळ निवासाची सुविधाच नाही, तर नागरिकांच्या दैनंदिन गरजा आणि देखभालीची व्यवस्थाही केली जाणार आहे. येथे विशेष वैद्यकीय उपचार, आरोग्यसेवा, पुनर्वसन, शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण अशा विविध सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या निवासी संकुलात रहिवाशांसोबतच त्यांच्या देखभालीसाठी कर्मचारी, डॉक्टर, आरोग्यसेवक आणि इतर सहाय्यक कर्मचारीही उपलब्ध असतील. त्यामुळे या प्रकल्पातून सुमारे 15 हजार नागरिकांचा एक मोठा समुदाय निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. गरजू नागरिकांना सुरक्षित निवारा, आरोग्यसेवा आणि आवश्यक आधार मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अनेक नागरिकांना दीर्घकालीन निवास आणि विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

पालघरमध्ये बिबट्याचा भीषण हल्ला! 65 वर्षीय महिला शेतमजुराचा मृत्यू

पालघर : पालघर जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्याने पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. डहाणू तालुक्यातील मतेगाव येथे बिबट्याने 65 वर्षीय महिला शेतमजुरावर हल्ला करून तिचा जीव घेतला. तुळशी रामा सावर असे मृत महिलेचे नाव असून, त्या विक्रमगड तालुक्यातील सरशी गावातील रहिवासी होत्या. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने बिबट्याला पकडण्याची मागणी केली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्या; प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांचे विभागप्रमुखांना निर्देश; विभागनिहाय कामांचा घेतला आढावा

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी-जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी विभाग प्रमुखांनी दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून गरजू नागरिकांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचवावेत. तसेच विविध विभागांकडील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून विकासकामांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन विभागनिहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी त्यांनी जिल्ह्यातील महत्त्वाचे प्रश्न, विविध विभागांसमोरील अडचणी, प्रलंबित कामांची सद्यस्थिती तसेच शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत माहिती जाणून घेतली.

जिल्ह्यात सध्या दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांना, विशेषतः शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी दुष्काळ निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी. नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर

विविध विभागांकडे प्रलंबित असलेली कामे विनाकारण



प्रलंबित राहणार नाहीत, याची संबंधित विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी. प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन ती तातडीने मार्गी लावावीत. शासनाने दिलेली उद्दिष्टे आणि निर्धारित केलेली कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असून, त्यासाठी विभागाने स्वतंत्र नियोजन करावे, असेही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले.

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांच्या प्रश्नांचे वेळेत निराकरण करणे आणि प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करणे यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. योजनांची अंमलबजावणी करताना केवळ उद्दिष्टपूर्ती न करता त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळतो की नाही, याकडेही संबंधित विभागांनी लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

विभागांमध्ये समन्वय ठेवून कामे पूर्ण करा

जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध कामे प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी परस्परांशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे. एका विभागाच्या कामाचा दुसऱ्या विभागाशी संबंध असल्यास संबंधित विभागांनी एकत्रितपणे प्रश्न सोडवावेत. समन्वयाच्या अभावामुळे कोणतेही काम रखडणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कामांची अचूकता, गुणवत्ता आणि वेळेचे नियोजन यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून प्रशासनाचे कामकाज अधिक परिणामकारक करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. प्रत्येक विभागाने आपापल्या जबाबदाऱ्या निश्चित करून कामांचा नियमित आढावा घ्यावा आणि निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करणे, या बाबींना विभाग प्रमुखांनी सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर, अप्पर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी, युवराज डापकर आदींसह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी उपस्थित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्या. भूषण काळे यांनी पालम येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कायदेविषयक व शासकीय योजनांच्या माहितीविषयक शिबिरासाठी सर्व विभागप्रमुखांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

पोलीस निरीक्षक राजू तडवी यांचा सत्कार; निलेश शेळके यांना निरोप



बिडकीन प्रतिनिधी : बिडकीन पोलीस ठाण्यात प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून राजू तडवी यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांची नियंत्रण कक्षात बदली झाल्याने त्यांना निरोप देण्यात आला.सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) सकाळी १० वाजता बिडकीन पोलीस ठाण्यात सत्कार व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके उपस्थित होते. यावेळी बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व पोलीस पाटील, सरपंच, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, महिला पोलीस पाटील, गावातील नागरिक तसेच पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी प्रभारी पोलीस निरीक्षक राजू तडवी यांच्याकडे पदभार सुपूर्द केला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या वतीने राजू तडवी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पोलीस पाटील, सरपंच, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार व पोलीस कर्मचाऱ्यांच्या वतीने निलेश शेळके यांचा सत्कार करून त्यांना पुढील सेवेसाठी शुभेच्छा देत भावपूर्ण निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस उपनिरीक्षक अशोक झिंजुर्डे, पोलीस उपनिरीक्षक मनोज

पाटील, पोलीस उपनिरीक्षक जगन्नाथ उबाळे व जमादार सचिन आगलावे , स्वप्निल दिलवाले,यांनी विशेष परिश्रम घेतले.

गुरु उपकार दिनानिमित्त विनयांजली सभा; मुनि विनिमेषसागरजींचा दशम दीक्षा दिवस



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर परमपूज्य आचार्य भगवंत श्री विनम्रसागरजी गुरुदेव यांच्या पावन सान्निध्यात मित्रनगर गार्डन परिसरात गुरु उपकार दिनानिमित्त विनयांजली सभा भक्तिमय वातावरणात पार पडली. यावेळी श्रमण मुनि श्री विनिमेषसागरजी महामुनीराज यांच्या दशम दीक्षा दिवसानिमित्त गुरुभक्ती, श्रद्धा आणि समर्पणाचा भावपूर्ण सोहळा रंगला.

मंगलाचरणानंतर गणाचार्य आचार्य श्री विरागसागरजी गुरुदेव यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून विनयांजली अर्पण करण्यात आली. श्रमणी आर्यिका विमलश्री माताजी यांनी गुरूंच्या चरणी भावांजली अर्पण केली. मुनि श्री विनिमेषसागरजी यांनीही आपल्या गुरूंप्रती कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या मनोगताने उपस्थित श्रावक-श्राविका भावविभोर झाले.

आचार्य श्रींनी प्रवचनातून गुरु-शिष्य परंपरा, संयम, सदाचार आणि धार्मिक संस्कारांचे महत्त्व विशद केले. गुरूंच्या मार्गदर्शनानुसार आचरण करणे हीच खरी गुरुदक्षिणा असल्याचे त्यांनी सांगितले. भगवान महावीर स्वामी यांच्या निर्वाण कल्याणकानिमित्त जैन परंपरेनुसार दीपावली साजरी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मान्यवर, जैन समाजबांधव व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

शिवना जि प प्रशालेत अवतरला 1993 चा दहावीचा वर्ग



अजिंठा प्रतिनिधी : शिवना ता सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद प्रशालेत वर्ष 1993 बॅचचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आला. 1993 पासून परीक्षा दिल्यानंतर जे वर्गमित्र आणि मैत्रिणी एकमेकांना कधी भेटल्याच नाही ते वर्गमित्र आणि मैत्रिणी या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांची पुन्हा एकदा भेट झाली आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मजी गटशिक्षणाधिकारी आदरणीय श्री फाळके सर आदरणीय श्री गोसावी सर आदरणीय श्री धनवई सर आदरणीय श्री शेख सर उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक श्री बाविस्कर सर होते. या कार्यक्रमास उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला जवळपास 80 ते 90 माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला पुन्हा एकदा 1993 च्या स्मृतींना उजाळा मिळाला पुन्हा एकदा दहावीच्या वर्गात बसून विद्यार्थी जीवनातील बालपण सर्वांनी अनुभवले पुन्हा एकदा शिक्षकांच्या छडींचा मार सर्वांनी अनुभवला मागील 33 वर्षात प्रत्येकाने गाठलेले यशाची शिखर उल्लेख करण्यात आले सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले आपल्या जीवनातील सुखदुःखांचे क्षण शेअर केले पाहुण्यांचे स्वागत गणेश माणिकराव प्रास्ताविक भाषण यहीया पठाण तर उत्कृष्ट सूत्र संचालन गणेश पाटिलबा काळे यांनी केले आभार प्रदर्शन राजू बाबा काळे यांनी तर नियोजनाची महत्वाची जबाबदारी उत्तम सोनवणे, दादाराव जाधव सोमनंदन काळे नाना केळोदे यांनी पहिली

बालकांच्या संरक्षणासाठी आशा यंत्रणा सदैव तत्पर – रवी पुराणिक

सुरक्षित बालपण अभियानांतर्गत परभणीत बालहक्क व बालसंरक्षण जनजागृती; 350 विद्यार्थ्यांचा सहभाग

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: बालकांचे हक्क, अधिकार आणि संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाभरात 'सुरक्षित बालपण अभियान' राबविण्यात येत आहे. बालकांच्या रक्षणासाठी आशा यंत्रणा सदैव तत्पर आणि सज्ज असल्याचे प्रतिपादन बाल न्याय मंडळाचे सदस्य रवी पुराणिक यांनी केले.

या अभियानांतर्गत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि चाइल्ड हेल्पलाइन, परभणी यांच्या वतीने जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालय, परभणी तसेच जिल्हा परिषद शाळा, धर्मापुरी येथे बालहक्क व बालसंरक्षण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या परिवीक्षा अधिकारी मनीषा तांदळे, तालुका संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन व वन स्टॉप सेंटरचे कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात बालकांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध सेवा, संकटसमयी मदतीसाठी तत्पर असणाऱ्या यंत्रणा, बालकांचे हक्क व अधिकार तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. बालकांच्या सुरक्षिततेमध्ये शिक्षकांची भूमिका आणि त्यांच्यावर असलेली महत्त्वाची जबाबदारी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी 'रोटी, खेल, पढाई, प्यार – हर बच्चे का है अधिकार' अशा घोषणांद्वारे बालहक्क व बालसंरक्षणाचा संदेश दिला.

हा जनजागृतीपर कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे आणि प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. एस. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

जिंतूरमध्ये 65 घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाखांचे अनुदान



जिंतूर : प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत जिंतूर नगर परिषद हद्दीतील पात्र घरकुल लाभार्थ्यांसाठी सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) अनुदान वितरण व बांधकाम कार्यादेश वाटपाचा कार्यक्रम पार पडला. नगराध्यक्ष प्रतापराव विनायकराव देशमुख यांच्या हस्ते ६५ लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले.

या योजनेअंतर्गत एकूण ६५ लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये याप्रमाणे ६५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. तसेच घरकुल बांधकामासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेल्या २० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे कार्यादेशही प्रदान करण्यात आले.

या निर्णयामुळे जिंतूर शहरातील गरजू कुटुंबांच्या स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार असून, घरकुल योजनेच्या अंमलबजावणीला गती मिळणार आहे. अशी माहिती जिंतूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

घाटीचे डॉ. मयूर पाटील एमएस परीक्षेत राज्यात प्रथम

अर्थोपेडिक विभागाची उल्लेखनीय कामगिरी; तिघांचा टॉप टेनमध्ये समावेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील अस्थिव्यंगोपचारशास्त्र (अर्थोपेडिक) विभागाचे डॉ. मयूर पाटील यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या नुकत्याच पार पडलेल्या एमएस परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. घाटीच्या इतिहासात प्रथमच या विभागातील विद्यार्थ्याने राज्यात अव्वल स्थान मिळविल्याने संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या परीक्षेत घाटीच्या तीन विद्यार्थ्यांनी पहिल्या दहा गुणवंतांमध्ये स्थान मिळविले. डॉ. मयूर पाटील यांनी प्रथम, डॉ. मोहम्मद शहजाद यांनी चौथा, तर डॉ. किरण शेळके पाटील यांनी राज्यात सातवा क्रमांक मिळविला. याशिवाय विभागातील अन्य नऊ विद्यार्थीही उत्तीर्ण झाले.



अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. बी. लिंगायत यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. या यशात प्रा. डॉ. अनिल धुळे, डॉ. मुक्तदीर अन्सारी, डॉ. गजानन देशमुख आणि डॉ. निलेश कचनेरकर यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी वायफाय, संगणक कक्ष, ग्रंथालय, सर्व सुविधायुक्त वसतिगृह आणि आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. घाटीत नवनवीन यंत्रणा व साधने उपलब्ध करून देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. वाढती रुग्णसंख्या आणि मुंबई-पुण्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी घाटीची निवड करत असल्याने संस्थेचा नावलौकिक वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विभागप्रमुख डॉ. एम. बी. लिंगायत यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. विभागात सर्वाधिक बाह्यरुग्ण व आंतररुग्ण संख्या असून, शैक्षणिक दर्जा उंचावण्यात विभागाला यश आले आहे. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचे पाठबळ आणि विभागातील सांघिक प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

फटाके उडवताना डोळ्यांची काळजी घ्या!

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दिवाळीत फटाक्यांच्या ठिणग्या, उष्णता आणि विषारी धुरामुळे दरवर्षी डोळ्यांना गंभीर दुखापत होण्याच्या घटना घडतात. फटाके उडवणाऱ्यांसह जवळ उभे असलेली लहान मुले आणि नागरिकही अशा घटनांचे बळी ठरतात. डोळ्यांचे कायमस्वरूपी नुकसान टाळण्यासाठी औरंगाबाद ऑप्थल्मॉलॉजिकल असोसिएशनतर्फे नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

फटाके उडवताना किंवा पाहताना डोळ्यांच्या संरक्षणासाठी योग्य सुरक्षा चष्मा वापरावा. फुलबाजी, अनार किंवा भुईचक्रापासून किमान पाच मीटर, तर आवाजाच्या फटाक्यांपासून किमान दहा मीटर अंतरावर उभे राहावे. लहान मुलांना एकट्याने फटाके उडवू देऊ नयेत. मोठ्यांच्या देखरेखीखालीच सुरक्षित ठिकाणी फटाके उडवावेत. जळालेल्या काड्या व फटाके विझवण्यासाठी पाणी आणि वाळू जवळ ठेवावी. न वाजलेला फटाका पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नये. अनार, भुईचक्र किंवा बॉम्ब हातात धरून पेटवू नयेत. डोळ्यात ठिणगी किंवा कण गेल्यास डोळे चोळू नयेत. डोळ्याला दुखापत झाल्यास त्यावर दाब देऊ नये. डोळ्यात काही घुसले असल्यास पाणी मारणे, मलम, तेल किंवा घरगुती उपाय करणे टाळावे. डोळ्यावर दाब न देता स्वच्छ कागदी कप किंवा योग्य संरक्षक कवच हलकेच ठेवून तातडीने नेत्र रुग्णालयात जावे. डोळ्यात वस्तू घुसली असल्यास ती स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. आपत्कालीन मदतीसाठी १०८ किंवा ११२ या क्रमांकांवर संपर्क साधावा. हे आवाहन असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. शुभा झंवर, सचिव डॉ. जगदीश लोया, कोषाध्यक्ष डॉ. अभिजित गोरे आणि वैज्ञानिक समितीच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पाटील वरे यांनी केले आहे.

रावसाहेब पाटील दानवे यांचा गुलाबराव पाटील कोलते यांनी केला सत्कार

सावळदबारा प्रतिनिधी : सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात भाजपचे नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी दि. ३१ ऑक्टोबर रोजी सावळदबारा परिसरात आले असतात . यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांची भेट घेऊन सत्कार केला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील बनकर, भाजपचे



अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील मोठे, जिल्हा उपाध्यक्ष अशोक गरूड, जे. के. चव्हाण, सुनील पाटील मिरकर, जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण काकडे, पंचायत समिती सदस्य वृषाली मिरकर, नितू ठाकूर, जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील, सभापती उत्तम चव्हाण, पं.स.सदस्य राहुल राठोड, गजानन पवार, जयप्रकाश चव्हाण, पंजाबराव कोलते, संभाजी पवार, एकनाथ सपाटे, बेलाप्पा पधाडे, दिनकर शिपल्कर, प्रमोद पाटील, लक्ष्मण पवार, लवकेश जाधव, प्रसाराम पवार, अनिल राठोड ,मयुर महाजन,अतुल चव्हाण, ज्ञानेश्वर सपाटे,राजु दांडगे, आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

एमजीएमचे क्रीडा संचालक नितीन घोरपडे बाराव्यांदा आयर्नमॅन गोव्यातील 'आयर्नमॅन 70.3' स्पर्धा 7 तास 38 मिनिटांत पूर्ण; प्रतिकूल परिस्थितीवर मात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाचे क्रीडा संचालक आणि मराठवाड्यातील पहिले आयर्नमॅन नितीन घोरपडे यांनी गोवा येथे आयोजित प्रतिष्ठित 'आयर्नमॅन ७०.३' ट्रायथलॉन स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. ही स्पर्धा पूर्ण करत त्यांनी बाराव्यांदा आयर्नमॅन किताब पटकावला. पणजी येथील मिरामार बीचवर 'आयर्नमॅन आशिया'च्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत १.९ किलोमीटर समुद्रात पोहणे, ९० किलोमीटर सायकलिंग आणि २१.१ किलोमीटर धावणे अशी आव्हानात्मक तीन टप्प्यांची शर्यत होती. समुद्रातील अस्थिर पाणी, उजव्या हाताला जेलीफिशचा दंश, महामार्गावरील चढ-उतार आणि ३३ अंश सेल्सिअस तापमान अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत घोरपडे यांनी ७ तास ३८ मिनिटांत स्पर्धा पूर्ण केली.

घोरपडे यांनी आतापर्यंत एकूण १२ वेळा आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केली आहे. यामध्ये 'आयर्नमॅन ७०.३' प्रकारात सात वेळा, तर पूर्ण 'आयर्नमॅन १४०.६' प्रकारात पाच वेळा यश मिळवले आहे. मलेशिया, जर्मनी, पोलंड, गोवा, हॅम्बर्ग, कोपनहेगन, इटली आणि एस्टोनिया येथे त्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे.

आपल्या अनुभवाच्या बळावर त्यांनी २० हून अधिक खेळाडूंना आयर्नमॅन स्पर्धेसाठी प्रशिक्षण दिले आहे. तसेच, गेल्या १५ वर्षांपासून व्यसनमुक्तीसाठी वैयक्तिक अनुभवांतून मार्गदर्शन व समुपदेशनाचे सामाजिक कार्य ते करीत आहेत. त्यांच्या यशाबद्दल एमजीएमचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह विविध क्रीडा संस्था, संघटना आणि क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले.

भावबंधांची हळवी गोष्ट उलगडणारा 'बंधू' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित!

'भाऊ काय, बंधू काय... जणू दूध आणि साय!' गीतकार गुरु ठाकूर यांच्या शब्दांतून व्यक्त झालेलं भावाचं नातं असंच काहीसं असतं. कधी एकमेकांशी भांडणारं, कधी रुसणारं, तर कधी स्वतःपेक्षाही दुसऱ्याच्या आनंदाचा विचार करणारं! या नात्यात कितीही मतभेद झाले, दुरावा निर्माण झाला, तरी मनाच्या एका कोपऱ्यात एकमेकांसाठी असलेली जागा कायम असते. याच अतूट भावबंधांची, प्रेमाची आणि त्यागाची हृदयस्पर्शी गोष्ट घेऊन येणाऱ्या 'बंधू' या आगामी मराठी चित्रपटाचा दमदार ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. उपेंद्र लिमये आणि जितेंद्र जोशी यांच्या दमदार अभिनयाची झलक असलेला हा ट्रेलर दोन भावांच्या नात्यातील विविध भावनिक पैलू उलगडतो. 'बंधू' चित्रपट येत्या २० नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे. अल्पावधीतच 'बंधू'च्या ट्रेलरला सोशल मीडियावर जोरदार प्रतिसाद मिळत असून, प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच या ट्रेलरने ट्रेंडिंगमध्ये स्थान मिळवले आहे. रजत बेदी प्रस्तुत, जे एस् डी स्टुडिओ आणि ट्राईफ्लिक्स एंटरटेनमेंट यांच्या सहकार्याने साकारलेल्या या चित्रपटाची निर्मिती प्रणव देसाई, जुही देसाई आणि कुलदीप सुनील ओझा यांनी केली आहे. चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शन नितीन सिंधूविजय सुपेकर यांनी केले आहे. 'आटपाडी नाईट्स' आणि 'सरला एक कोटी' या चित्रपटांनंतर नितीन सुपेकर पुन्हा एकदा मानवी नात्यांच्या भावविश्वाचा वेध घेणारी कथा घेऊन प्रेक्षकांसमोर येत आहेत.

दुष्काळग्रस्त महाराष्ट्रातील गोशाळांना प्रतिपशू प्रतिदिन 100 रुपये अनुदान द्या!

गोशाळा महासंघ, जिल्हा हिंगोली यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

हिंगोली : महाराष्ट्रात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा फटका गोशाळांनाही बसत आहे. चारा व पाण्याची टंचाई, वाढता खर्च आणि जनावरांचे संगोपन करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, राज्यातील सर्व गोशाळांमधील पशुधनासाठी प्रतिपशू प्रतिदिन १०० रुपये अनुदान मंजूर करावे, अशी मागणी गोशाळा महासंघ, जिल्हा हिंगोली यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर



करण्यात आले असून, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केला असताना गोशाळांमधील पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक गोशाळा दानशूर व्यक्तींच्या मदतीवर आणि लोकसहभागातून चालवल्या जातात. मात्र, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत चारा, पाणी आणि पशुखाद्याचा खर्च भागविणे कठीण होत आहे. परिणामी, गोशाळा चालकांसमोर पशुधनाचे संगोपन करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

काही शेतकरी आपली जनावरे विक्रीसाठी बाजारात आणत असून, अशा परिस्थितीत गोशाळांवरील जबाबदारीही वाढत आहे. पशुधनाचे संरक्षण, चारा-पाण्याची उपलब्धता आणि गोशाळांचे व्यवस्थापन सुरळीत राहण्यासाठी शासनाने आर्थिक मदत देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील गोशाळांमधील पशुधन वाचविण्यासाठी आणि दुष्काळाच्या संकटात गोशाळांना आधार देण्यासाठी प्रतिपशू प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी गोशाळा महासंघाचे प्रकाशचंद्र सोनी यांनी केली आहे. शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी कृषी विभागाकडून उपाययोजना; कृषी विभागाचे मार्गदर्शक शासन परिपत्रक जारी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने कृषी विभागाने विविध उपाययोजना निश्चित केल्या आहेत. यामध्ये चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य, शासकीय जमिनीवर चारा उत्पादन आणि उपलब्ध यंत्रसामग्रीच्या वापरावर भर देण्यात आला आहे. यासंदर्भात कृषी विभागाने आज, दि. २ नोव्हेंबर रोजी मार्गदर्शक शासन परिपत्रक निर्गमित केले आहे.

राज्यात नैर्ऋत्य मोसमी पावसातील तूट, पावसाचे असमान वितरण आणि खरीप पिकांच्या उत्पादनात झालेली घट यामुळे रब्बी हंगामात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन या उपाययोजना निश्चित करण्यात आल्या आहेत.

चारा पिकांच्या लागवडीला प्राधान्य

रब्बी हंगामात चारा पिकांसाठी आवश्यक बियाण्यांची जिल्हानिहाय व पीकनिहाय मागणी पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने निश्चित करण्यात येणार आहे. महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ तसेच संबंधित संस्थांच्या माध्यमातून बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी कार्यवाही करण्यात येईल.

कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीत उत्पादन देणारी आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणारी चारा पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि सिंचनाच्या उपलब्धतेनुसार योग्य पिकांची शिफारस करण्यात येईल.

शेतकऱ्यांना प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन

स्थानिक परिस्थितीनुसार मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, सुगरग्रेज आदी चारा पिकांच्या लागवडीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. सिंचनाची सुविधा असलेल्या क्षेत्रात चारा उत्पादन वाढविण्यासाठी खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, योग्य कापणी आणि चाऱ्याची साठवणूक यावर भर दिला जाणार आहे.

चारा पिकांचा उत्पादन खर्च, अपेक्षित उत्पादन, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन याबाबत शेतकरी प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येतील. यासाठी कृषी विज्ञान केंद्रे, कृषी विद्यापीठे आणि पशुसंवर्धन विभागाचा सहभाग राहणार आहे.

शासकीय जमिनीवर चारा उत्पादन

कृषी विभागाच्या अधिपत्याखालील कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे आणि महाबीजच्या उपलब्ध जमिनीचा आढावा घेऊन योग्य क्षेत्रावर चारा पिकांची प्राधान्याने लागवड करण्यात येणार आहे. तसेच हायड्रोपोनिक, अझोला आणि बिनकाटेरी निवडुंग लागवडीसारख्या पर्यायी चारा उत्पादन पद्धतींबाबत कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून कार्यक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यंत्रसामग्री व चारा उत्पादन क्षेत्रांचे नियोजन

जिल्ह्यातील कस्टम हायरिंग सेंटर आणि कृषी औजारे बँकांमधील उपलब्ध यंत्रसामग्रीची माहिती शेतकरी व पशुसंवर्धन विभागाला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच चारा उपलब्धता असलेल्या क्षेत्रांचे मॅपिंग, पीकनिहाय पेरणी क्षेत्र आणि अपेक्षित उत्पादनाची माहिती संकलित करून चारा उत्पादक शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्थांचे नेटवर्क तयार करण्यात येईल.

या सर्व उपाययोजनांची कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विभागीय, जिल्हा आणि तालुका स्तरावर समन्वयाने अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. कृषी आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाहीचा नियमित आढावा घ्यावा, असेही शासन परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

इंटर्न डॉक्टरांचे विद्यावेतन 30 हजार रुपये करा : अभाविपचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील शासकीय व अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांतील इंटर्न डॉक्टरांचे मासिक विद्यावेतन १८ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये करावे, खासगी वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यावेतनाच्या अनियमिततेवर नियंत्रण आणावे आणि फिजिओथेरपीच्या इंटर्न विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतनाचे स्पष्ट धोरण निश्चित करावे, अशा विविध मागण्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) केल्या आहेत. यासंदर्भात परिषदेने मुख्यमंत्री व वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना निवेदन सादर केले आहे.

वैद्यकीय शिक्षणाच्या अंतिम टप्प्यातील इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना रुग्णालयांत प्रत्यक्ष रुग्णसेवा, आपत्कालीन सेवा आणि विविध वैद्यकीय प्रक्रियांमध्ये महत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागते. मात्र, या सेवेच्या तुलनेत मिळणारे विद्यावेतन अपुरे असून, वाढती महागाई, निवास, प्रवास व दैनंदिन खर्चामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासकीय व अनुदानित वैद्यकीय तसेच आयुष महाविद्यालयांतील इंटर्न विद्यार्थ्यांचे विद्यावेतन दरमहा ३० हजार रुपये करावे, अशी मागणी परिषदेने केली आहे. खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये काही विद्यार्थ्यांना पूर्ण विद्यावेतन मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर शासन निर्णय व संबंधित नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, महाविद्यालयांचे नियमित लेखापरीक्षण व तपासणी करून विद्यावेतन वितरणाची खातरजमा करावी, थकीत विद्यावेतन तातडीने द्यावे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. फिजिओथेरपीच्या इंटर्न विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी विद्यावेतन मिळत नसल्याच्या तक्रारी असून, काही महाविद्यालयांकडून इंटर्नशिपसाठी शुल्क आकारले जात असल्याचेही परिषदेने निदर्शनास आणले आहे. या विद्यार्थ्यांसाठी स्पष्ट विद्यावेतन धोरण तयार करावे, इंटर्नशिपच्या नावाखाली नियमबाह्य शुल्क आकारण्यास प्रतिबंध करावा आणि संबंधित महाविद्यालयांची चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अभाविपचे देवगिरी प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे म्हणाले, इंटर्न विद्यार्थी प्रत्यक्ष रुग्णसेवेची जबाबदारी पार पाडत असल्याने त्यांच्या योगदानाची योग्य दखल घेऊन त्यांना न्याय्य विद्यावेतन मिळणे आवश्यक आहे. विद्यावेतनवाढ, खासगी महाविद्यालयांतील अनियमिततेवर नियंत्रण आणि फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन लागू करण्याबाबत शासनाने ठोस व कालबद्ध निर्णय घ्यावा. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक कार्यवाही होईपर्यंत अभाविप सातत्याने पाठपुरावा करेल.

नाण्यांतून उलगडला भारताचा 2600 वर्षांचा इतिहास : 'शहरनामा'तर्फे नाण्यांच्या संग्रहालयात हेरिटेज वॉक; परदेशी पर्यटकांसह नागरिकांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : नाणी ही केवळ आर्थिक व्यवहाराचे साधन नसून तत्कालीन राजसत्ता, संस्कृती, व्यापार आणि सामाजिक जीवनाचा इतिहास सांगणारी महत्त्वपूर्ण साधने आहेत. याच नाण्यांच्या माध्यमातून भारताचा सुमारे २६०० वर्षांचा इतिहास उलगडणारा हेरिटेज वॉक महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठातील अण्णासाहेब टाकळगव्हाणकर नाण्यांच्या संग्रहालयात (कॉइन गॅलरी) आयोजित करण्यात आला.

एमजीएम विद्यापीठाचा इतिहास व पुरातत्त्व विभाग, आख्यान फाउंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, ॲडगाइड मीडिया प्रा. लि., केंद्रीय पर्यटन विभाग आणि टीम 'शहरनामा' यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. पुरातत्त्वज्ञ प्रा. आशुतोष पाटील यांनी विविध नाण्यांचा ऐतिहासिक प्रवास रंजक पद्धतीने उलगडला.




मानवी व्यवहाराच्या सुरुवातीच्या काळात वस्तू, प्राणी, धान्य, कवड्या आणि प्राण्यांची चामडी यांचा विनिमयासाठी वापर होत असे. पुढे धातूचा चलन म्हणून वापर सुरू झाला आणि इ.स.पूर्व सहाव्या शतकात भारतात नाण्यांचा उदय झाला. प्राचीन चांदीच्या नाण्यांवर प्राणी, पक्षी, झाडे, चंद्र आणि सूर्य यांसारखी निसर्गाशी संबंधित चिन्हे आढळतात, अशी माहिती प्रा. पाटील यांनी दिली.

इंडो-ग्रीक, रोमन, मौर्य, कुशाण, गुप्त, सातवाहन, चोल, विजयनगर, शिवकालीन, मुघल आणि ब्रिटिशकालीन नाण्यांचा इतिहासही त्यांनी विशद केला. नाण्यांच्या माध्यमातून राजे आपले सामर्थ्य आणि सांस्कृतिक ओळख अधोरेखित करत असत. छत्रपती शिवाजी महाराजांची शिवराई नाणी १९५० पर्यंत महाराष्ट्रात चलनात होती. सातवाहन राणी नागनिकेने स्वतःच्या नावाने नाणी पाडली, तर मोहम्मद गझनीने देवनागरी लिपीचा वापर केलेली नाणी जारी केली. आदिलशहाचे 'लारी' नाणे समुद्री व्यापारातून भारतात आले, तर जहांगीरने नजराण्यासाठी सुमारे १२ किलो वजनाचे सोन्याचे नाणे तयार करवून घेतले होते. भारतात सर्वप्रथम सोन्याची नाणी कुशाण राजांनी पाडल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या हेरिटेज वॉकमध्ये विविध वयोगटांतील नागरिकांसह परदेशी पर्यटकांनी सहभाग घेतला. यानंतर एमजीएमच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ॲस्ट्रोस्पेस सायन्स सेंटर अँड क्लबच्या वतीने दुर्बिणीतून सूर्यदर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. दुपारी १२ वाजता झालेल्या या उपक्रमात लहान मुलांसह उपस्थितांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, रमाकांत रौतल्ले, ॲडगाइड मीडियाचे ओम परदेशी, श्रीनिवास औंधकर, संजय टाकळगव्हाणकर आणि एमजीएमचे प्रवीण देशमुख उपस्थित होते. तसेच अंतराळ विज्ञान केंद्राचे अशोक क्षीरसागर, नेहा खंडाळकर आणि योगेश साळी यांनी सूर्यदर्शन उपक्रमासाठी सहकार्य केले.





मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911